महाराष्ट्र शासन

# राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष

८वा मजला, न्यु. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई ४००००१

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.mahacet.org
ई-मेल : maharashtra.cetcell@gmail.com

**क्र.संकिर्ण-२२२९/प्र.क.०२४/सेतू/सीईटी/1578** **दिनांक- ०६/०६/२०१९**

## जाहीर सुचना

### सेतू सुविधा केंद्र व सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या शिक्षणासाठी केंद्रभूत प्रवेश प्रक्रियेबाबत

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी तंत्रशिक्षण, उच्च शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, आयुष, कृषी शिक्षण, मत्स्य व दुग्ध, कला शिक्षण या विभागांतर्गत असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्हयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन / समुपदेशन आणि मुळ कागदपत्राची पडताळणी करण्यासाठी शुक्रवार, दिनांक ०७ जून, २०१९ पासून विविक्षित ठिकाणी सेतू सुविधा केंद्रे सुरु करण्यात येत आहेत. जिल्हानिहाय सेतू सुविधा केंद्राची यादी www.mahacet.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ज्या विद्यार्थ्यांनी सीईटी परीक्षा तसेच अभ्यासक्रमांशी संबंधित इतर राष्ट्रीय प्रवेश परीक्षा दिलेल्या आहेत अश्या विद्यार्थ्यांनी शुक्रवार, दिनांक ०७ जून, २०१९ पासून www.mahacet.org या संकेतस्थळावर जाऊन विहित लिंकवर क्लिक करून नाव नोंदणी करावी. नोंदणी केल्यानंतर स्वत: निवडलेल्या सेतू सुविधा केंद्रामध्ये पूर्वनियोजन केलेल्या वेळी भेट देऊन प्रवेश प्रक्रिया अर्ज व त्या संबंधीत आवश्यक असणारी कागदपत्रे तपासणी करून घ्यावीत. उक्त संकेतस्थळावर तसेच आपल्या लॉग इन मध्ये प्राप्त झालेल्या सूचना, केंद्रीय प्रवेश प्रक्रिया
वेळापत्रक/ शासकीय परीपत्रके यांचे नियमित अवलोकन करावे. तसेच केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिये (CAP) शी संबंधीत वेळापत्रकाबाबत www.mahacet.org या संकेतस्थळावर भेट द्यावी.

शेठ गोविंद रघुनाथ साबळे फार्मसी कॉलेज,
सासवड या महाविद्यालयात
"सेतू सुविधा केंद्र"
उपलब्ध आहे.
संपर्क :- 9890311157
9960743549
9922259398.

सही/-

आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य, मुंबई